**आरबीआय/२००७-०८/१९**
**महापरिपत्रक क्र ०३/२००७-०८** **जुलै २,२००७**
प्रति,

विदेशी चलनातील व्यवहारासाठी अधिकृत बँका
माननीय महोदय/महोदया,

**<u>नॉन-रेसिडेंट ऑर्डिनरी रुपी (एनआरओ) खात्याबाबत महापरिपत्रक</u>**

अधिकृत डिलर/अधिकृत बँकेने भारताबाहेरील निवासी असलेल्या व्यक्तिंकडून ठेवी स्विकारणे, वेळोवेळी दुरुस्त करण्यात आलेल्या एफइएमए अधिसूचना क्र. ५/२००० आरबी दिनांक मे ३, २००० सह वाचावयाच्या विदेशी चलन व्यवस्थापन अधिनियम, १९९९ च्या कलम ६ च्या उपकलम (१) आणि(२) च्या तरतूदीद्वारे नियमित करण्यात आले आहे.

२. या महापरिपत्रकात ***"नॉन-रेसिडेंट ऑर्डिनरी रुपी (एनआरओ) खाते"*** या विषयावरील सर्व विद्यमान सूचना एका ठिकाणी एकत्रित केल्या आहेत. या महापरिपत्रकात अंतर्भूत केलेल्या परिपत्रकांची/अधिसूचनांची सूची खालील परिशिष्टात दिली आहे.

३. हे परिपत्रक एक वर्षाच्या सनसेट कलमानिशी निर्गमित करण्यात आले आहे. हे परिपत्रक जुलै १, २००८ रोजी मागे घेतले जाईल आणि या विषयावरील अद्यतन महापरिपत्रक त्याच्या जागी आणले जाईल.

आपला विश्वासू
(सलीम गंगाधरन)
मुख्य महाव्यवस्थापक

## अनुक्रमणिका


१.व्याख्या------------------------------------------------------------------------------------------------------------ ३

२.पात्रता------------------------------------------------------------------------------------------------------------- ३

३. खात्यांचे प्रकार ---------------------------------------------------------------------------------------३

४. निवासी/अनिवासींसह संयुक्त खाती ------------------------------------------------------------------ ४

५. अनुज्ञेय जमा/वजावट------------------------------------------------------------------------------------- ४

६. मत्तेचे वित्तप्रेषण-----------------------------------------------------------------------------------------------४

७. अ-भारतीय वंशाच्या विदेशी नागरिकांची भारत भेट ---------------------------------------------- ६

८. खातेधारकांना आणि तृतीय पक्षाला अधिकृत डिलर/
बँकेकडून कर्ज/उचल मंजूरी ---------------------------------------------------------------------------------७

९. खातेधारकाच्या निवासी स्थितीत बदल ------------------------------------------------------------७

१०. कर्जदाराच्या निवासी स्थितीत बदल झाल्याच्या
स्थितीत कर्ज /उचल परामर्ष----------------------------------------------------------------------------------८

११. अ-निवासी/निवासी नामनिर्देशितीला निधीचे प्रदान ---------------------------------------------८

१२.मुखत्यारपत्र धारकाद्वारे एनआरओ खात्याचे प्रचालन--------------------------------------------९

१३.अभ्यासासाठी विदेशी जाणाऱ्या व्याक्तिला सुविधा -----------------------------------------------९

१४. आंतरराष्ट्रीय क्रेडीट कार्डस्-------------------------------------------------------------------------------९

१५. आयकर-------------------------------------------------------------------------------------------------------९

परिशिष्ट--------------------------------------------------------------------------------------------------------११

| नॉन-रेसिडेंट ऑर्डिनरी रुपी (एनआरओ) खाते योजनेवरील महापरिपत्रक | |
|---|---|
| **१. व्याख्या** | अनिवासी भारतीय(एनआरआय) या हेत्वर्थ एनआरआयची व्याख्या एफइएमए अधिसूचना क्र. ५ दिनांक मे ३, २०००, च्या नियमन २ मध्ये केलेली आहे. या अधिसूचनेनुसार, एनआरआय म्हणजे भारताच्या बाहेर राहणारी एखादी व्यक्ति जी भारताची नागरिक किंवा मूळ भारतीय वंशाची आहे.<br>भारतीय वंशाची व्यक्ति (पीआयओ)ः या हेत्वर्थ पीआयओची व्याख्या एफइएमए आयबीआडी च्या नियमन २ मध्ये बांगलादेश किंवा पाकिस्तान वगळता कोणत्याहि अन्य देशाचा नागरिक, जर (अ) तिने कोणत्याही काळी भारतीय पारपत्र धारण केले असेल किंवा (ब) ती किंवा त्याच्या पालकांपैकी कोणीही एक किंवा त्याच्या ग्रँड-पालकांपैकी कोणीहि भारतीय घटनेमुळे किंवा सिटीझनशिप अधिनियम, १९५५ (१९५५ चा ५७) मुळे भारताचे नागरिक असतील, किंवा व्यक्ति भारतीय नागरिकाची जोडीदार किंवा उपकलम (अ) किंवा (ब) मध्ये संदर्भित व्यक्ति असेल. |
| २. पात्रता | (अ) भारताबाहेर राहणारी कोणतीही व्यक्ति/एकक रुपयात अभिधानित केलेले एफइएमएच्या तरतूदी, नियम, त्याखाली केलेल्या नियमानांचा भंग न करणारे प्रामाणिक व्यवहार पूर्ण करण्यासाठी अधिकृत डिलर किंवा अधिकृत बँकेत एनआरओ खाते उघडू शकतो.<br>(ब) बांगलादेशी/पाकिस्तानी नागरिकत्वाच्या/मालकीच्या व्यक्तिने/एककाने खाते उघडण्यासाठी रिझर्व्ह बँकेची पूर्वानुमति आवश्यक आहे. |
| **३. खात्यांचे प्रकार** | एनआरओ खाती चालू, बचत, आवर्ती किंवा नियत ठेव खात्याच्या स्वरूपात उघडता/ठेवता येतील. या खात्यांना लागू असलेला व्याजाचा दर आणि अशी खाती उघडण्यासाठी, प्रचलित करण्यासाठी आणि ठेवण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे रिझर्व बँकेने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेश/सूचनांनुसार असतील. |
| **४. निवासी/अ-निवासी समवेत संयुक्त खाती** | खाती निवासी आणि/किंवा अ-निवासी समवेत संयुक्तपणे धारण करता येतील. |
| **५. अनुज्ञेय जमा/वजावटी**<br>**अ. जमा** | (१) भारताबाहेरून सामान्य बँकिंग वाहिन्यांद्वारे मुक्त परिवर्तनीय असलेल्या विदेशी चलनात वित्तप्रेषित केलेले उत्पन्न.<br>(२) भारतातील तात्पुरत्या भेटी दरम्यान खातेधारकाने जमा केलेले कोणतेही मुक्त परिवर्तनीय विदेशी चलन. युएस डॉलर ५००० किंवा सममूल्य पेक्षा आधिक असलेल्या रोख स्वरूपातील विदेशी चलनाच्या पुष्ट्यर्थ करन्सी |

| | |
|---|---|
| | डिक्लरेशन फॉर्म जोडावा. रुपयातील निधीची, जर तो भारताबाहेरून आणलेला असेल तर रोखीकरण प्रमाणपत्राद्वारे पुष्टी करण्यात यावी.<br>(३) अ-निवासी भारतीयांच्या रुपया खात्यातून हस्तांतरण<br>(४) खाते धारकाची भारतातील कायदेशीर येणे रक्कम. यामध्ये भाडे, लाभांश, निवृत्ती वेतन, व्याज वगैरे सारखे चालू उत्पन्न त्याचप्रमाणे रुपया/विदेशी चलनाद्वारे प्राप्त केलेल्या किंवा मृत्यूपत्रित संपत्ती/वारसाहक्काने प्राप्त झालेल्या स्थावर मालमत्तेसहित मत्तेच्या विक्रीचे उत्पन्नही समाविष्ट आहे. |
| **ब. वजावटी** | (१) रिझर्व बँकेने केलेल्या संबंधित नियमनांच्या पूर्तते अधीन भारतातील गुंतवणूकीसाठी प्रदानासह रुपयातील सर्व स्थानिक प्रदाने.<br>(२) खाते धारकाच्या भारताबाहेरील भाडे, लाभांश, निवृत्ती वेतन, व्याज वगैरे सारख्या चालू उत्पन्नाचे भारतात वित्तप्रेषण.<br>(३) अधिकृत डिलर बँकेला समाधानकारक वाटेल अशा हेतूसाठी प्रति आर्थिक वर्षासाठी (एप्रिल-मार्च) युएस डॉलर १ दशलक्ष पर्यंत वित्तप्रेषण. |
| **६. मत्तांचे वित्तप्रेषण**<br>**६.१** मूळ भारतीय वंशाच्या विदेशी नागरिकाद्वारे मत्तेचे वित्तप्रेषण | विदेशी देशाचा नागरिक, जर तो नेपाळ किंवा भूतानचा नागरिक नसेल किंवा मूळ भारतीय वंशाची व्यक्ति नसेल, जी भारतातील नोकरीतून निवृत्त झाली आहे, किंवा जिने एफइएमए च्या कलम ६ च्या उपकलम (५) मध्ये संदर्भित व्यक्तिकडून वारशाने मत्ता प्राप्त केली असेल, किंवा एखादी विधवा भारताबाहेर राहणारी असेल आणि तिने भारतातील निवासी असलेल्या दिवंगत भारतीय नागरिक पतिकडून वारशाने मत्ता प्राप्त केली असेल, तर ती वित्तप्रेषकाद्वारे मत्तेच्या वारशाबाबत किंवा मृत्यूपत्रित संपत्तीबाबत, संपादनाबाबत पुष्टीकारक कागदोपत्री पुरावा आणि केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाने त्यांच्या परिपत्रक क्र. १०/२००२ दिनांकित ऑक्टोबर ९, २००२ अन्वये विहीत केलेल्या नमुन्यातील चार्टर्ड अकाऊंटंटचे प्रमाणपत्र आणि वित्तप्रेषकाद्वारे वचनपत्र हजर केल्यानंतर, प्रत्येक आर्थिक वर्षात यूएस डॉलर १,०००,००० (यूएस डॉलर एक दशलक्ष मात्र) पेक्षा अधिक नसलेली रक्कम वित्तप्रेषित करू शकते. |
| **६.२ अनिवासी भारतीय/पीआयओ द्वारे वित्तप्रेषण** | (अ) अनिवासी भारतीय/पीआयओ, एनआरओ खात्यात धारण केलेल्या शिलकीतून/मत्तेच्या विक्रीच्या |

| | |
|---|---|
| | उत्पन्नातून/त्याने वारशाने/मृत्यूपत्राद्वारे भारतात संपादित केलेल्या मत्तेतून, वित्तप्रेषकाद्वारे मत्तेचे संपादन, वारसा किंवा मृत्यूपत्राच्या पुष्ट्यर्थ कागदोपत्री पुरावा, आणि वित्तप्रेषकाचे वचनपत्र आणि केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाने त्याच्या परिपत्रक क्र. १०/२००२ दिनांक ऑक्टोबर ९, २००२ द्वारे विहीत केलेल्या नमुन्यातील चार्टर्ड अकाऊंटंटचे प्रमाणपत्र हजर केल्यावर प्रति आर्थिक वर्ष यूएस डॉलर १,०००,००० पेक्षा अधिक नसलेली रक्कम वित्तप्रेषित करू शकतो.<br><br>(ब) एनआरआय/ पीआयओ, वर दिल्याप्रमाणे यूएस डॉलर १ दशलक्षाच्या एकूण मर्यादेअधीन, त्याच्या पालकांपैकी एकाने किंवा त्याच्या जवळच्या नातेवाईकाने (कंपनी अधिनियम, १९५६ च्या कलम ६ मध्ये केलेल्या व्याख्येनुसार) तडजोडीच्या कराराच्या अधीन आणि तडजोड करणाऱ्याच्या मृत्यूनंतर प्रभावी होणाऱ्या तडजोडीच्या अधीन संपादन केलेल्या मत्तेच्या विक्रीचे उत्पन्न, तडजोडीचा मूळ करार आणि केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाने त्यांच्या परिपत्रक क्र. १०/२००२ दिनांक ऑक्टोबर ९, २००२ अन्वये विहीत केलेल्या नमुन्यातील चार्टर्ड अकाऊंटंटचे प्रमाणपत्र आणि वित्तप्रेषकाचे वचनपत्र हजर केल्यानंतर, वित्तप्रेषित करू शकतो. |
| **६.३ रुपया निधीतून भारतात संपादन केलेली मत्ता** | एनआरआय /पीआयओ निवासी म्हणून किंवा एनआरआय /पीआयओ म्हणून रुपया निधीतून त्याने संपादित केलेल्या स्थावर मालमत्तेच्या विक्रीचे उत्पन्न, कोणत्याही बंधित कालावधीविना, उक्त प्रति आर्थिक वर्ष यूएस डॉलर १ दशलक्ष मर्यादेच्या अधीन वित्तप्रेषण करू शकतो. |
| **६.४ बंधने** | (अ) स्थावर मालमत्तेच्या विक्रीच्या उत्पन्नाच्या बाबतीतील वित्तप्रेषणाची सुविधा, पाकिस्तान, बांगलादेश, श्रीलंका, चीन, अफगाणिस्तान, इराण, नेपाळ आणि भूतालच्या नागरिकांना उपलब्ध नाही.<br><br>**(ब)** पाकिस्तान, बांगलादेश, नेपाळ आणि भूतान यांच्या नागरिकांसाठी अन्य आर्थिक मत्तेच्या विक्रीच्या उत्पन्नाचे वित्तप्रेषण करण्याची सुविधा नाही. |
| **७. अ-भारतीय वंशाचा विदेशी नागरिक भारत भेटीवर** | भारत भेटीवर येणारा विदेशी नागरिक त्यांनी बँकिंग वाहिनीद्वारे भारताबाहेरून वित्तप्रेषण केलेल्या निधीने किंवा त्यांनी भारतात आणलेल्या विदेशी चलनाच्या विक्रीने एनआरओ खाते(चालू/ बचत) घडू शकतो. एनआरओ खात्यातील शिल्लक रक्कम अधिकृत डिलर/ बँक त्याच्या भारत सोडण्याच्या वेळी विदेशी चलनात |

| | |
|---|---|
| | रूपांतरित करून देऊ शकतात, जर खाते सहा महिन्यांपेक्षा कमी कालावधीसाठी ठेवले असेल आणि त्यात देय झालेल्या व्याजाव्यतिरिक्त अन्य कोणताही स्थानिक निधी जमा झालेली नसेल. |
| **८. खातेधारकांना आणि तृतीय पक्षांना अधिकृत डिलर/बँकेने कर्ज/उचल मंजूर करणे** | (अ) अधिकृत डिलर /बँका अनिवासी खातेधारकाना आणि तृतीय पक्षांना नियत ठेवींच्या सुरक्षे समक्ष खालील अटी आणि शर्तींच्या अधीन रुपयात कर्जे मंजूर करू शकतात.<br>(१) कर्जे केवळ कर्जदाराच्या वैयक्तिक गरजा भागविण्यासाठी आणि/किंवा व्यावसायिक हेतूने वापरता येईल आणि शेतीविषयक/लागवडविषयक कामांसाठी किंवा रियल इस्टेट व्यवसाय किंवा दुसऱ्याला कर्ज देण्यासाठी नाही.<br>(२) मार्जिन आणि व्याजाचा दर याबाबत रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी ठरवून दिलेल्या नियमनांची पूर्तता केली जावी.<br>(३) अशा तृतीय पक्षांना दिलेल्या कर्जाच्या बाबतीत व्यापार/उद्योगाना कर्ज देताना लागू केले जाणारे सर्व साधारण नियम आणि बाबी लागू होतील.<br>(ब) अधिकृत डिलर/बँका खातेदाराच्या खात्यात अधिकर्षासाठी व्याज दर वगैरेच्या बाबतीतील आदेशांच्या पूर्तते अधीन आणि त्यांच्या व्यावसायिक अनुमानाच्या आधारे परवानगी देऊ शकतात. |
| **९. खातेदाराच्या निवासी स्थितीत बदल(अ) निवासी वरून अनिवासी** | जेव्हा एखादी व्यक्ति नोकरीसाठी किंवा व्यवसाय करण्यासाठी किंवा भारताबाहेर सुटीसाठी किंवा कोणत्याही अन्य हेतूने त्याचा अनिश्चीत काळासाठी भारताबाहेर राहण्याचा उद्देश दर्शवून विदेशात जाण्यासाठी (नेपाळ किंवा भूतान वगळता अन्य) भारत सोडतो तेव्हा, तिचे विद्यमान खाते अनिवासी (सामान्य ) खाते म्हणून संबोधावे.<br>जेव्हा भारताची निवासी व्यक्ति नेपाळ किंवा भूतानला, नोकरीसाठी किंवा व्यवसाय करण्यासाठी किंवा भारताबाहेर सुटीसाठी किंवा कोणत्याही अन्य हेतूने त्याच्या अनिश्चीत काळासाठी भारताबाहेर राहण्याचा उद्देश दर्शवून जाण्यासाठी भारत सोडतो तेव्हा त्याचे विद्यमान खाते निवासी खाते म्हणून चालू राहील. अशा खात्याला अनिवासी (सामान्य) खाते (एनआरओ) म्हणून संबोधू नये. |
| **(ब) अनिवासी वरून निवासी** | नोकरीसाठी किंवा व्यवसाय करण्यासाठी किंवा कोणत्याही अन्य हेतूने त्याच अनिश्चीत काळासाठी भारतात राहण्याचा उद्देश दर्शवून खातेदार भारतात परतल्यानंतर एनआरओ खाते पुन्हा निवासी रुपया खाते म्हणून संबोधित करावे. जेव्हा खातेदार तात्पुरत्या |

| | |
|---|---|
| | भेटीसाठी भारतात येतो, तेव्हा अशा भेटीदरम्यान खाते अनिवासी समजणे चालूच राहील. |
| **१०. कर्जदाराच्या निवासी स्थितीत बदल झाल्या प्रकरणी कर्जे /अधिकर्ष यांचा परामर्ष** | एखाद्या व्यक्तिने भारतातील निवासी असताना कर्ज/अधिकर्षाच्या सुविधेचा फायदा घेतला आणि नंतर ती व्यक्ति भारताबाहेरील निवासी झाली तर त्या प्रकरणी अधिकृत डिलर/बँक त्यांच्या व्यावसायिक अनुमानाच्या आणि स्वनिर्णयाच्या आधारे कर्ज/अधिकर्ष सुविधा चालू ठेवू शकते. अशा प्रकरणी, व्याजाचे प्रदान आणि कर्जाची परतफेड अंतर्गामी वित्तप्रेषणाद्वारे किंवा संबंधित व्यक्तिच्या भारतातील कायदेशीर स्रोतांतून करता येईल. |
| **११.अनिवासी/निवासी नामनिर्देशितीला निधीचे प्रदान निवासी नामनिर्देशिती** | मयत खातेदाराच्या एनआरओ खात्यातील अनिवासी नामनिर्देशितीला देय असलेली रक्कम नामनिर्देशितीच्या भारतातील अधिकृत डिलर/बँकेतील एनआरओ खात्यात जमा करावी. मयत खातेदाराच्या एनआरओ खात्यातील निवासी नामनिर्देशितीला देय असलेली रक्कम नामनिर्देशितीच्या भारतातील बँकेत असलेल्या निवासी खात्यात जमा करावी. |
| **१२. एनआरओ खात्याचे मुखत्यारपत्र् धारकाद्वारे प्रचालन** | अधिकृत डिलर्सना/बँकांना अनिवासी भारतीय व्यक्तिगत खातेधारकाने निवासीच्या नावे मंजूर केलेल्या मुखत्यारपत्राद्वारे एनआरओ खात्याचे प्रचालन करण्यासाठी अधिकार प्रत्यायोजित केले आहेत. जर अशी प्रचालने (१)रिझर्व बँकेने केलेल्या संबंधित नियमनांच्या पूर्ततेच्या अधीन पात्र गुंतवणूवकींसाठी प्रादानासहित रुपयातील स्थानिक प्रदाने, आणि (२) लागू असलेल्या करांच्या नक्त, अनिवासी भारतीय व्याक्तिगत खातेधारकाच्या भारतातील चालू उत्पन्नाचे भारताबाहेर वित्तप्रेषण यांच्या पुरतेच मर्यादित असतील.<br>निवासी मुखत्यारपत्र धारकाला अनिवासी भारतीय खातेधारक व्यक्तिच्या खात्यात धारण केलेल्या निधीव्यतिरिक्त अन्य खात्यात धारण केलेला निधीतील भारताबाहेर प्रत्यवर्तित करण्यास किंवा अनिवासी भारतीय खातेधारकाच्या वतीने निवासीला भेटीच्या मार्गाने प्रदान करण्यास किंवा खात्यातून दुसऱ्या एनआरओ खात्यात निधी हस्तांतरित करण्यास परवानगी असणार नाही. |
| **१३. विदेशात शिक्षणासाठी जाणाऱ्या व्यक्तिसाठी सुविधा** | शिक्षणासाठी विदेशी जाणाऱ्या व्यक्तिला अनिवासी भारतीय(एनआरआयज) मानण्यात येते आणि अनिवासी भारतीयांना उपलब्ध असलेल्या सुविधांसाठी ते पात्र असतात. त्यांनी भारतातील निवासी म्हणून प्राप्त |

| | |
|---|---|
| | केलेली शैक्षणिक आणि अन्य कर्जे एफइएमए नियमनानुसार उपलब्ध होत राहतील. |
| **१४. आंतरराष्ट्रीय क्रेडिट कार्डस्** | अधिकृत डिलर / बँकांना रिझर्व्ह बँकेच्या पूर्वानुमतिविना एनआरआयज/पीआयओजना आंतरराष्ट्रीय क्रेडिट कार्डस देण्यासाठी अनुमति देण्यात आली आहे. असे व्यवहार अंतर्गामी वित्तप्रेषणाद्वारे किंवा कार्डधारकाच्या एफसीएनआर/एनआरइ/एनआरओ खात्यातील शिल्लक रकमेतून पूर्ण करता येतील. |
| **१५. आयकर** | वित्तप्रेषणासाठी (लागू असलेल्या करांच्या नक्त) अधिकृत डिलर/बँकांना, सेंट्रल बोर्ड ऑफ डायरेक्ट टॅक्सेस, वित्त मंत्रालय, भारत सरकार यांनी त्यांच्या परिपत्रक क्र. १०/२००२ दिनांक ऑक्टोबर ९, २००२ (सीएफ. ए.पी. (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र. ५६ दिनांक नोव्हेंबर २६, २००२) द्वारे विहित केलेल्या नमुन्यातील चार्टर्ड अकाउंटंटकडील प्रमाणपत्र आणि वित्तप्रेषकाचे वचनपत्र हजर केल्यानंतर परवानगी देण्यात येईल. |

**परिशिष्ट**

## या महापरिपत्रकात एनआरओ खात्याबाबतच्या एकत्रित केलेल्या अधिसूचनांची / परिपत्रकांची सूचि

| अनु.क्र. | अधिसूचना/परिपत्रक | तारीख |
|---|---|---|
| १. | अधिसूचना क्र. एफइएमए ६२/२००२-आरबी | मे १३, २००२ |
| २. | अधिसूचना क्र. एफइएमए ९७/२००३-आरबी | जुलै ८, २००३ |
| ३. | अधिसूचना क्र. एफइएमए ११९/२००४-आरबी | जून २९, २००४ |
| १. | एपी (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र. ४५ | मे १४, २००२ |
| २. | एपी (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र. १ | जुलै २, २००२ |
| ३. | एपी (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र. ५ | जुलै १५, २००२ |
| ४. | एपी (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र. १९ | सप्टेंबर १२, २००२ |
| ५. | एपी (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र. २६ | सप्टेंबर २८, २००२ |
| ६. | एपी (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र. २७ | सप्टेंबर २८, २००२ |
| ७. | एपी (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र. ५६ | नोव्हेंबर २६, २००२ |
| ८. | एपी (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र. ५९ | डिसेंबर ९, २००२ |
| ९. | एपी (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र. ६७ | जानेवारी १३, २००३ |
| १०. | एपी (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र. ४३ | डिसेंबर ८, २००३ |
| ११. | एपी (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र. ४५ | डिसेंबर ८, २००३ |
| १२. | एपी (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र. ६२ | जानेवारी ३१, २००४ |
| १३. | एपी (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र. ४३ | मे १३, २००५ |
| १४. | एपी (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र. १२ | नोव्हेंबर १६, २००६ |
| १५. | एपी (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र. ६४ | मे २५, २००७ |